19) इ. 11 वी व 12 वी मधील नियमित विद्यार्थ्यांचे प्रवेश शिक्षण उपसंचालक यांनी ठरवून दिलेल्या निकषानुसार व माध्यमिक शाळा संहिता नियमावली 1986 मधील नमूद नियमानुसार असणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

सदरहू परिपत्रकातील क्रमांक 1 ते 19 मध्ये दर्शविण्यात आलेल्या सूचनेप्रमाणे आपण आपल्या स्तरावर योग्य ती काळजी घेवून व विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी वरील माहिती ही विद्यार्थ्यांना कळविण्यात यावी. व सूचना फलकावर लावावी. तसेच सूचना मिळाल्याची स्वाक्षरी संबंधित विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावी व आपल्या दप्तरी जतन करून ठेवावी.

महत्वाची टिप :–

1) परप्रांत/परदेशातील विद्यार्थ्यांना इ. 11 वी व 12 वी मध्ये प्रवेश देताना योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरून घेणे आवश्यक आहे. योग्यता प्रमाणपत्र अर्ज विद्यार्थ्यांकडून भरून न घेतल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

2) योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याकरिता संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील योग्यता प्रमाणपत्र अर्जाचे काम करणा-या लिपिकासच मंडळ कार्यालयात पाठवावे.

( रविकांत देशपांडे )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलीपी :-

1) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता समादराने अग्रेषित आपणांस कळविण्यात येते की, राज्याबाहेरील व देशाबाहेरील विद्यार्थ्यांना इ.11वी, 12वी मध्ये प्रवेश देण्यासंबंधी या परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना कनिष्ठ महाविद्यालये सुरू होण्यापूर्वी आपले कार्यालयामार्फत पुनःश्च देण्यात याव्यात.

3) शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर/भंडारा/गोंदिया/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली यांना माहितीस्तव अग्रेषित, त्यांनीही त्यांच्या स्तरावर योग्य ती दखल घेवून मंडळास सहकार्य करावे.